# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२,E शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

२५६५६२३४, फॅक्स २५६५६२३४, E-mail : ropune.dte@gmail.com


**कालमर्यादा**

जा.क्रं.विकापु/आस्था-०१/२००९/1036 दिनांक : 29 JAN 2009

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कराड
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय कराड
शासकीय तंत्रनिकेतन पुणे/कराड/कोल्हापूर/सोलापूर/मिरज/अवसरी/
शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन पुणे
म.रा.हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरिंग टेक्नॉलाजी पुणे
उपसचिव, म.रा. तंत्रशिक्षण मंडळ वि.का.पुणे
संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे

**विषयः- तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय आस्थापने वर कार्यरत अधिका-यांची व शिक्षंकांची माहिती**

संदर्भः- १)संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांचे पत्र क्रं. ३/तंशिसं/आयटीडिसी/२००८/१९ दिनांक १८-१०-२००८
२) या कार्यालयाचे पत्र क्रं.विकापु/आस्था-१/२००८/८७८२ दि. ११-११-२००८
३) या कार्यालयाचे पत्र क्रं.विकापु/आस्था-१/२००८/१०३३६ दि. २३-१२-२००८
४)संचालक, तंत्रशिक्षण मुंबई यांचे पत्र क्रं. ३/तंशिसं/आयटीडिसी/२००९/२२ दिनांक १४-१-२००९

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय संस्था व विभागीय कार्यालये तसेच म.रा. तंत्रशिक्षण मंडळ व त्यांची विभागीय कार्यालये यात कार्यरत असलेल्या वर्ग १ व २ चे अधिकारी व शिक्षक यांची माहिती संकलीत करण्याची कार्यवाही तंत्र शिक्षण संचालनालयांचे विचाराधीन असल्याने त्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भाधिन पत्र १ २,व ३ अन्वये आवश्यक त्या सूचना आपणांस पाठविण्यात आलेल्या आहेत. सदरची माहिती भरण्याविषयी दिनांक २० नोहेंबर २००८ मुदत देण्यात आलेली होती परंतु अद्याप पर्यंत काही सस्थांनी पूर्णपणे माहिती भरली नसल्याचे उपरोक्त संदर्भ ४ अन्वये संचालनालयाने या कार्यालयास कळविण्यात आले आहे.

तरी आपल्या संस्थेतील वर्ग १ व २ चे अधिकारी व शिक्षक यांची अपूर्ण माहिती दोन दिवसात पूर्ण करुन केलेल्या कार्यवाहीचा तपशिल दिनांक ३१-१-२००९ पूर्वी फॅक्सद्वारे या कार्यालयास कळविण्यात यावा म्हणजे त्याप्रमाणे संचालनालयास कळविणे या कार्यालयास शक्य होईल.

दिलेल्या मुदतीत कार्यवाही पूर्ण न झालेस संस्थाप्रमुखांस जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

गो.पं.चौधरी

(गो.पं.चौधरी)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत- १) मा. संचालक, तंत्रशिक्षण तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना माहितीसाठी सादर
२) प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता